# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भातला शासन आदेश केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी, राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याकडे आज सुपूर्द केला. सामंत यांनी नवी दिल्लीत आज शेखावत यांची भेट घेऊन, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, मात्र अद्याप अधिसूचना निघाली नसल्याबद्दल विचारणा केली. त्यानंतर लगेचच हा शासन आदेश सुपूर्द करण्यात आला.

****

१८ व्या प्रवासी भारतीय दिन संमेलनाला आजपासून भुवनेश्वर इथं सुरुवात झाली. यासाठी ५० देशांतून भारतात येणाऱ्या अनिवासी भारतीयांसमोर ओडिशा राज्याची समृद्ध संस्कृती आणि वारशाचं सादरीकरण करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, तर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शुक्रवारी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी असतील. प्रवासी भारतीय दिनासाठी यंदा ‘विकसित भारतासाठी भारतीय समुदायाचं योगदान’ ही मुख्य संकल्पना ठेवण्यात आली आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज आंध्रप्रदेशात विशाखापट्टणम इथं विविध विकासकामांचं लोकार्पण, उद्घाटन तसंच पायाभरणी होत आहे. एकंदर दोन लाख कोटींहून अधिक किंमतीच्या या प्रकल्पांमध्ये पुडीमाडाका इथल्या राष्ट्रीय हरित हायड्रोजन मोहिमेअंतर्गत पहिल्या हरित हायड्रोजन हबचा समावेश आहे. त्यासाठी अंदाजे एक लाख ८५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. यामुळे पुढील पाच वर्षात पाचशे गिगावॅट अ-जीवाश्म ऊर्जाक्षमता गाठण्याची लक्ष्यपूर्ती होणार आहे. याशिवाय, साडे एकोणीस हजार कोटी रुपये मूल्यांच्या विविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचं उद्घाटन तसंच लोकार्पण, दक्षिण कोस्ट रेल्वे मुख्यालय,

नक्कापल्ली इथं बल्क ड्रग पार्कची पायाभरणी, तर कृष्णपट्टमणम् औद्योगिक परिसराची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

`एक देश एक निवडणूक` या दोन विधेयकांवरील संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. संसदेच्या ३९ सदस्यीय संयुक्त समितीचे अध्यक्ष भाजप खासदार पीपी चौधरी हे आहेत. ही समिती संसदेच्या आगामी अधिवेशनात शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी आपला अहवाल सादर करणार आहे.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था–इस्रोचे नवे अध्यक्ष आणि अंतराळ विभागाचे सचिव म्हणून व्ही नारायणन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इस्रोचे सध्याचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांच्याकडून १४ जानेवारी रोजी नारायणन पदभार स्वीकारतील. नारायणन सध्या केरळमधल्या वालियामाला इथल्या इस्रोच्या एल पी एस सी म्हणजे लिक्विड प्रोपल्शन सिस्टीम सेंटरचे संचालक असून रॉकेट आणि अंतराळयान यांचा दीर्घ अनुभव असलेले ते एक प्रतिष्ठित शास्त्रज्ञ आहेत.

****

मुंबई महापालिकेनं नूतनीकरण केलेल्या डॉ भाऊ दाजी लाड संग्रहालयाचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज लोकार्पण झालं. एखाद्या शहराची श्रीमंती ही तिथे राहणाऱ्या श्रीमंत लोकांवरून किंवा मोठ्या इमारतींवरून नव्हे, तिथल्या संग्रहालयांच्या माध्यमातून दिसून येते. असंच एक उत्तम संग्रहालय आपल्या हस्ते खुलं होत असल्याबद्दल मनस्वी आनंद होत असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

****

धाराशिव इथं काल ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ या उपक्रमाचं उद्घाटन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात करण्यात आलं. हा उपक्रम सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून राबवला जात असून, यामुळे वाचकांना नवनवीन पुस्तकांच्या दुनियेशी ओळख करून देण्याचा प्रयत्न होणार आहे. तसंच सामूहिक वाचन कार्यक्रम, वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी कार्यशाळा आणि लेखक, विद्यार्थ्यांमधल्या संवादासाठी विशेष सत्रे आयोजित केली जाणार आहेत. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात ग्रंथ प्रदर्शनही भरवण्यात आलं आहे.

****

लातूर इथं उद्यापासून तीन दिवसीय मराठवाडा शैक्षणिक महासंमेलन आणि प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. संयोजन समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरळे यांनी काल लातूर इथं ही माहिती दिली. या महासंमेलनात विविध क्षेत्रातले तज्ज्ञ आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या प्रेरणादायी मुलाखती आणि तज्ज्ञांच्या व्याख्यानांसह, नाविन्यपूर्ण, अद्ययावत, शैक्षणिक साधनांचे १०० पेक्षा अधिक स्टॉल्स पाहता येणार आहेत.

****

अंबाजोगाई इथल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात उद्या नऊ जानेवारीला प्राचार्य बी. के. सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेण्याचं आवाहन संयोजकांनी केलं आहे.

****

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी महिला दुहेरीच्या पहिल्या फेरीतल्या सामन्यात थायलंडच्या जोडीचा २१-१०, २१-१० असा पराभव केला आणि अंतिम सोळामध्ये प्रवेश मिळवला.

****